# शब्दप्रधान देवमाणूस – यशवंत देव

यशवंत देवांशी कधी मैत्री झाली ते आठवण कठीण आहे पण अेक मात्र नक्की आठवतय की जी झाली ती घटट मैत्रीच झाली.

त्याआधी खूपदा आमचे साहित्यकाव्यप्रेमी मित्रदवय शशी आीण उषा मेहेता यांच्याकडून देवांच्या हरहुन्नरीपणाबद्दल अैकल होत. देवांनी स्वरबद्ध केलेल्या अरुण दाते व इतर मराठी गायकांच्या अनेक लोकप्रिय अवीट गाण्यांतल्या सुराशब्दांनी केव्हाच मन जिंकल होतं. माझं मुंबईतील आयुष्य जरी शिवाजी पार्क भागातच गेल होत तरी देवांना भेटण काही झाल नव्हतं. मग अेक दिवशी उषाताई मेहेता मला त्यांच्याकडे काही कारणास्तव घेऊन गेली. ती पहिली ओळख. प्रथमदर्शनी बोलण्याने जिंकणाऱ्या काही लोकांच्यात देवाची गणना होऊ शकेल. बोलण्यात सतत नर्म विनोदाची खैरात असल्यामुळे त्या भेटीत मी खूप हसल्याचे आठवतेय. नंतरच्या दर मुंबईभेटीत देवांच्या घरची भेट ठरलेलीच असायची. आधी उषाताईबरोबर नंतर थोडी भीड चेपल्यावर अेकटीनेच. त्यांच्या घरी गेल्यावर पेणहून आलेले पोहे व चहा हा बेत ठरलेला असायचा. देव पेणचे व अजूनही पेणशी संबंध ठेवून असल्यामुळे त्यांच्या घरी सतत पेणचे पोहे असायचे. त्याबरोबरच ‘ ह्या सारखे चविष्ट पोहे कोठेही नसतात ‘अस म्हणत कितीही पोट भरलेले असले तरी प्रेमाने खायला घालायचा जिव्हाळाही असायचा. देवांची बायको पोहे करायचीही अगदी चविष्ट.

काही वर्षांनी सौ. देवांचे कॅन्सरने निधन झाल्यानंतर देवांचा दुसरा विवाह नीलम प्रभू ह्यांच्याबरोबर झाला. नीलम प्रभूची करुणा देव झाली. देव करुणाताईंच्या जागेत शिवाजीपार्कमधेच राहायला गेले.

अेके दिवशी मोहन रानडेचा फोन आला की " येत्या सप्टेंबर मधे देव येताहेत. त्यांचा पूर्ण अमेरिकेभर दौरा मी आयोजित करतोय. त्यांच्या बरोबर गायला उत्तरा केळकरही येते आहे. फिलाडेल्फियातील कार्यक्रम तुमच्याकडे ठेवू का ? " त्यावेळी मी स्वत; कलाक्षेत्रात इतकी गुंगले नव्हते. आम्ही फक्त फिलाडेल्फियाचे रामुभैया दाते होतो. कदरदान.गुणग्राही. अमेरिकेत आमच्या भागात आलेल्या कलाकारांचा पाहुणचार करणे, त्यांचे कार्यक्रम आयोजित करणे ह्यातच आनंद घेत होतो. अमका कलाकार आमच्याकडे येऊन गेला, तमका जेवून गेला ह्यातच धन्यता मानत होतो. मोहन रानडेच्या प्रस्तावाला मी अत्यानंदाने होकार दिला.

देवांच्या अमेरिकाभेटीच्या दरम्यान न्यूजर्सीमधे अनिवासी मराठी लोकांनी लिहीलेल्या लेखांच्या ' कुंपणापलिकडच शेत' या पुस्तकाचा प्रकाशनसोहळा करायचे ठरले होते. सोहळयाला मंगेश पाडगावकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहाणार होते. कार्यक्रमाला दोन दिवस राहिले असताना ' सोहळयाला स्वागत गीत असल तर जास्त शोभा येइल ' अस सोहळयाच्या संयोजकांना वाटलं. अनायसे अमेरिकेत देव होते व त्यांच्याबरोबर त्याची हुकमी प्रतिभाही .

देवांना विनंती केल्यावर काहीही आढेवेढे न घेता त्यांनी बघताबघता अेक स्वागतगीत रचलं . तशाच वेगाने ते स्वरबद्ध केलं व आमच्या भागातल्या अेका सुस्वर गळयातून गाऊनही घेतलं. अेक दिवसातलं त्यांच हे सुरेल, सुरचित गतिमान क्रिअेशन आमच्या सर्वांच्या मनावर अगदी कोरल गेल. सरस्वती त्यांच्या हाकेला इतकी तातडीने धावून जाते हे प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे आम्ही थक्क होऊन गेलो.

त्या सोहळयानंतर देवांचे संपूर्ण अमेरिकेत कार्यक्रम सुरु झाले. साथीला आलेली उत्तरा केळकर तेव्हा नवखी होती, आम्हाला तिच्याबद्दल जास्त माहिती नव्हती. तोपर्यंत तिला‘ मराठी आशा ‘हा खिताब मिळाला नव्हता. त्यामुळे कार्यक्रमाच्या वेळी उत्तराच्या गळयातली जादू अैकून श्रोते मोहित झालेच पण देवाच्या हरहुन्नरीपणानेदेखील भारावले. तिच्यासमवेत गाणी गाताना त्यांनी घेतलेल्या जागा , त्यांच मराठीवरच प्रभुत्व, त्यांचा कोटीभास्कर मिश्कील स्वभाव ह्यामुळे आमच्याकडचा कार्यक्रम इतका रंगला की तो संपायच्या आतच दुसरा कार्यक्रम करायची बोलणी सुरु झाली. देवांच वेळापत्रक पाहून Same time, same place, and  a month later असा वायदा ठरला. त्या महिन्याअखेरीस भारताला परत जायच्या आधी खास लोकाग्रहास्तव देव अेक कार्यक्रम आमच्या घरी करणार होते.

महिना भुर्रकन संपला. आमच्याकडचा दुसरा लोकाग्रहात्सव आखलेला कार्यक्रम दोन दिवसांवर आला. उत्तरा

वेस्ट कोस्टवर होती पण देवांचा अमेरिकेत कुठे पत्ताच लागेना. ते उत्तराबरोबर अमेरिकेत अनेक ठिकाणी कार्यक्रम करत फिरत होते हे माहित होतं. सगळीकडे फोन फिरवून झाले पण कोणालाही ते नक्की कोठे आहेत हे माहित नव्हत. आमच धाब दणाणल. रानडयांच्या तोंडचं पाणीच पळालं. त्यांच्यावर सगळी जबाबदारी होती. मग अेके दिवशी देव परत आले. मात्र आले तेव्हा त्यांचा पोशाख आमूलाग्र बदलला होता. त्यांनी अंगात भगवा झब्बा घातला होता. गळयात रुद्राक्षाची माळ होती, त्याला मध्यभागी मोठ पदक लावल होत आिण त्यामध्ये आचार्य रजनीशांचा फोटो होता. यशवंत देव चक्क रजनीश पंथात सामिल झाले होते, रजनीशी झाले होते. त्या कारणाने गेले दहा दिवस त्यांचा पत्ता लागला नव्हता. त्यावेळी आचार्य रजनीशांबद्दल लोकांना जास्त माहिती नव्हती व जी होती ती फार विचीत्र होती. ओरेगॉन राज्यात त्यांची शेकडो अेकरांची जागा आहे, त्यावर मोठा आश्रम आहे . तिथे अमली पदार्थ व फ्री सेक्स ह्याच साम्राज्य आहे. २२ मर्सेडिसचा ताफा आहे . संभोगातून समाधीकडे या मुलख्यावेगळया चळवळीचे ते जनक आहेत व त्यांना जबरदस्त फॅन फॉलोईग आहे. विनोद खन्ना फिल्म इंडस्ट्री सोडून त्यांच्या मागे लागल्याचही कानावर आल होत. त्यामुळे आपल्यातल्या अेकाने अशा माणसाच शिष्यत्व पत्करल हयाच भारी आश्चर्य वाटत होतं. मी तर त्यांना व त्यांच्या गळयातल्या रजनीशी पदकाला बघून चक्क उडाले होते.

थोडी विश्रांति चहापाणी वगैरे झाल्यावर देवांच्यासमोर मी या नाजुक विषयाला हात घातला.” हे काय खूळ काढल तुम्ही

‘असा प्रश्न मी देवाना हसतहसत विचारला मात्र, आणि नेहमीचे मजा करणारे देव अेकदम गंभीर झाले व म्हणाले “ मीना मी तुला बुद्धिमान समजतो. त्या माणसाविषयी तू स्वत; माहिती जमा केली आहेस का अैकीव माहितीच्या आधारे तू हे बोलते आहेस? रजनीश हे अेक थोर विचारवंत आहेत म्हणून मी त्यांच मोठ्या अभिमानाने शिष्यत्व पत्करल आहे. आधी त्यांच्याबद्दल सगळी नीट माहिती जमव. मग आपण सविस्तर बोलू. “ त्यांच्या स्वरातल्या गंभीर व थोडयाशा रागावलेल्या सुरामुळे मी गप्प बसले. लगेच कार्यक्रम सुरु करायचा होता त्यामुळे त्यावेळी जास्त चर्चा, चर्वितचर्वण करण योग्यही नव्हतं. कार्यक्रम अपेक्षेप्रमाणे खूपच रंगला.तो संपल्यानंतर देवांच्या खास फर्माइशीवरुन पिठल भाताची पंगत बसली. दुसऱ्या दिवशी देव भारतात जाणार असल्यामुळे रजनीश प्रकरण परत उगाळून काढण्यात अर्थ नव्हता. प्रकरण तिथेच संपल.

वर्षे लोटली. रजनीशांचे ओशो झाले. देव शिवाजीपार्कलाच आमच्या अधिक जवळ रहायला आले. शब्दप्रधान गायकीवर त्यांनी दोन छानपैकी पुस्तके लिहीली. चांगली मैत्री झाली असल्यामुळे मुंबईला गेले की माझी अेक चक्कर देवांकडे असायचीच. त्यांच्या घरी गेल्यावर दर्शनी भिंतीवरच लावलेल्या ओशोच्या मोठया फोटोचं दर्शन व्हायचं. ओशोंची काही वाक्ये, उतारेही लावलेले असायचे. त्याबद्दल चर्चा व्हायच्या. त्यानंतर आमच्या गाजलेल्या सुंदरा मनामधे भरलीच्या प्रयोगानिमित्ताने माझ्या मुंबई भेटी वाढायला लागल्या. देव व करुणाताई अनेक प्रयोगाना आले. त्यामुळे

नाटयगृहामध्येच भेटी व्हायला लागल्या. सुंदराच्या शतकमहोत्सवी प्रयोगाला काढलेल्या स्मरणिकेच्या निमित्ताने मी लिहायला सुरुवात केली. लोकप्रभेच्या अमेरिकेहून या सदरासाठी मी लिहीलेले लेख छापून यायला लागले होते. अेखादा लेख आवडला की करुणाताई आवर्जून कळवायच्या. मैत्री वाढत होती.

त्या सुमारास मी अमेरिकेत गाण शिकायला लागले होते. अेकदा मुंबइला गेल्यावर मी त्यांच्याकडे गेले व म्हणाले “माझी अेक रिक्वेस्ट आहे. “ पुढच काहीही न अैकता ते म्हणाले “ हो, मान्य.” मी म्हटल “ कशाला हो म्हटल तुम्ही ? मी तर अजून तुम्हाला काय ते सांगितलही नाही. “ते म्हणाले “ जे काही म्हणणार आहात त्याला हो.” मला खूप हसू आलं. त्याबरोबरच ह्या अेवढया मोठया माणसाच मार्दव पाहून आश्चर्यही वाटलं. संगीताच्या क्षेत्रात इतक प्रचंड काम केलेल्या या थोर माणसाने माझी काय मागणी आहे हे न विचारताच हो म्हटल होतं. मी त्यांना सांगितल की “ मी हल्लीच गाण शिकायला लागले आहे. मला काहीतरी टिप्स द्या ना. “ तेवढयात करुणाताई म्हणाल्या “ अगदी चुकीचा माणूस निवडलात तुम्ही मार्गदर्शन करायला. अहो त्यांनी माझ गाण बंद केल. पूर्वी मी चांगली ऑर्केस्ट्रात गायचे. पण ह्यांनी माझं गाण अैकल व चक्क गाण बंद करायला लावल. म्हणाले की व्हे, फार वाइट गातेस.” त्यावर देव म्हणाले, “ मला जर हिने विचारल की मी कशी गाते तर मी खरच सांगणार. मी म्हटल वाइट गातेस. पण गाऊ नकोस अस

सांगितल नाही. हिने आपणहून  बंद केल गाणं. मी गाण्याच्या बाबतीत खोटं बोलणार नाही. “नंतर करुणाताईंकडे वळून म्हणाले ,” गाण तू स्वत;हून बंद केलस की नाही. अग किती बायका वाइट गातात पण तरीही गातात. हौस असेल तर अजूनही गा ना.”

मला त्यांच्या प्रेमाच्या भांडणांच हसू येत होतं. पण तो प्रकार बघून वाटल की माझ तोंड न उघडता पळता पाय घ्यावा. उगीच हात दाखवून अवलक्षण कशाला । म्हणून उठले तर देव म्हणाले “ अहो गाणार होता ना .”  मी म्हटल “ नको . मी फक्त तुमच्याकेड टिप्स मागत होते.” देव म्हणाले “ मी टिप्स कसल्या देणार ? अेकच सांगतो. कोणीही गाऊ शकत पण प्रामाणिकपणे गायल तर. उगीच आवाज चोरुन ,आखडून गायल तर कधीच येणार नाही. गाण पोटातून आल पाहिजे. अेकाद्या लांबच्या व्यक्तिला हाक मारायची असेल तर तुम्ही ओरडता ना ? तेव्हा कसा तुमचा आवाज चढतो । तस आतून गायल तर आवाजाला कसलाच प्रॉब्लेम येत नाही. मोकळ गाव . गाण्यातला अर्थ समजून गाव. गाण आपण शब्द सुरातून पोचवायसाठी गातो. शब्द तोडून मोडून बिघडवून गाऊ नये. नाहीतर बेरंग होतो. त्यापेक्षा ती चांगली कविता चक्क वाचायला द्यावी. वाचकाला निदान शब्दाची जादू तरी कळेल. गा पण गाताना अेकरुप होऊन गा. शब्दाशी सुराशी बेइमानी करु नका. “ हे सांगताना त्यांच्या डोळयात पाणी आल होतं. संगीतावर त्यांची किती

भक्ति होती त्याचंच ते प्रतिक होतं. होतकरु गायकांना किती मोलाचा सल्ला दिला होता देवांनी.

नंतर नंतर त्यांच्या घरची गेल्यावर बेल वाजवल्यावर देवच दार उघडायचे कारण करुणाताईंना पायाचा त्रास सुरु झाला होता. जितक्या वेळी बेल वाजायची तितक्या वेळी देव पटकन उठायचे, पटकन जाऊन दार उघडून यायचे. अेकदा मी तिथे असताना त्यांना निदान आठ वेळा दार उघडायला लागल. मी त्याना म्हटल " या वयात तुम्ही कसे अेवढे ॲक्टीव्ह ? " ते म्हणाले " ह्या वयात म्हणजे ? माझ अस कितीस वय झालय ? वयाचा विचार करायचा नाही. तो केलात की संपलात. मी रोज सकाळी चालायला जातो. तास दीड तास वाट फुटेल तसा फिरुन येतो. पाय मोकळे झाले की अंग मोकळ होत. " तेव्हा त्यांनी सत्तरी पार केली होती.

देव जेव्हा ७५ वर्षांचे झाले , तेव्हा मुंबईला त्यांच्या चाहत्यांनी जेष्ठ संगीतदिग्दर्शक अनिल बिश्वासांच्या अध्यक्षतेखाली अमृतमहोत्सवानिमित्त मोठा सत्कारसमारंभ घडवून आणला होता. त्यानंतर लागलीच त्यांचा अमेरिका दौरा ठरला. अर्थातच आमच्या घरी अेक कार्यक्रमही ठरला. आम्ही नवीन घरात राहायला गेलो होतो. आमचं नव घर त्यांना खूपच आवडलः, देव म्हणाले, " ही वास्तू अतिशय प्रसन्न आहे. या वेळी मी इथे गायला आलोय पण पुढच्यावेळी मी इथे रहायला येणार आहे. " कार्यक्रमाच्या मध्यंतरात मी त्यांचा दोन्ही पद्धतीने , वाढदिवस साजरा केला. मराठी पद्धतीने पंचारती ओवाळून व अमेरकिन पद्धतीप्रमाणे केक कापून. देव खूष झाले होते. चौदा

पंधरा वर्षानंतर ते आमच्याकडे आले होते, कार्यक्रमाला खूप गर्दी झाली होती. कार्यक्रम नेहमीप्रमाणेच रंगतदार झाला.

२००१ साली मी बृहनमहाराष्ट्र मंडळाच्या कॅलगरी अधिवेशनासाठी सह्याद्रीचे स्वगत हा कार्यक्रम बसवत होते. लेखन, दिग्दर्शन संगीत सबकुछ मीच केल होत. देवांसारखा जाणकार माणूस अनायसे आमच्या भागात आला होता म्हणून मी देवांना स्क्रिप्ट नेऊन दाखवलं . त्यांना ते खूपच आवडल. वाचल्यावर अेक झक्कपैकी स्वस्तिक रेखाटून V  Good असा रिमार्कही लिहून ठेवला त्यांनी त्या स्क्रिप्टवर. मी त्यांना त्या कार्यक्रमासाठी केलेल्या चाली अैकवल्या. ते म्हणाले " बेसिक चाली चांगल्या आहेत पण तू ह्या क्षेत्रातली नाहीस म्हणून खूप ठिकाणी कमी पडताहेत."  बघताबघता त्यांनी मूळ ढाचा तसाच ठेवून त्या चालीत थोडे थोडे बदल केले आणि सगळी गाणी नखरेल करुन टाकली. चाली अैकून मी खूप खूष झाले. मी म्हटल, " संगीत दिग्दर्शक म्हणून तुमच नाव टाकते." ते म्हणाले ," नाही. मूळ काम तुझ आहे.तुला श्रेय मिळायलाच हव. पाहिजे तर  माझ नाव संगीत मार्गदर्शक म्हणून टाक." काही न करताही सगळ श्रेय ढापणाऱ्या क्षेत्रात राहूनदेखील देवांच्यातला देवमाणूस शिल्लक राहिला होता.

२००७ ला माझ अवघा रंग अेकचि झाला हे संगीत नाटक प्रभाकर पणशीकरांच्या नाटयसंपदा हया संस्थेतर्फे प्रदर्शित झाले. माइलस्टोन प्रयोगांना अेकादा नामवंत आमंत्रित करायचा ही पणशीकरांची पध्दत. त्या परंपरेनुसार २५ व्या प्रयोगाला मी देवांना सन्माननीय पाहुणे म्हणून घेऊन गेले.

त्यांना नाटक अतिशय आवडले. नंतर कितीतरी दिवस ते त्यातल्या आवडलेल्या जागा मला सांगत असत. “अवघा रंग “ च्या निमित्ताने माझ्या मुंबई भेटी परत अेकदा वाढल्या. त्याच सुमारास मी सामना या वर्तमानपत्रासाठी दर रविवारी लिहायला लागले होते. त्यातल्या आवडलेल्या लेखांविषयीही देव माझ्याशी आठवणीने बोलायचे.

२०१३ च्या बृहनमंडळाच्या अधिवेशनासाठी मी यशवंत देव वा हृदयनाथ मगेशकर यापैकी अेकाच्या गीतावर आधारित कार्यक्रम मी बसवत होते. तेव्हाही देवानी मला अनेक मी न अैकलेली गाणी अैकवली होती. पण नृत्याच्या दृष्टीने विचार केल्यावर मंगेशकराच्या कोळी व ठाकरांच्या गाण्यांनी बाजी मारली व मी हृदयनाथ मंगेशकराच्या संगीतावर सगितीका केली.

करुणाताईही त्यांना जेव्हा कायमच्या सोडून परलोकीच्या प्रवासाला गेल्या तेव्हा मी त्यांना भेटायला गेले होते. ते खिन्न जरुर दिसले पण त्यांची गाण्याची जगण्याची उमेद संपली नव्हती. वय वाढले तरीही नवनिर्मितीच्या ध्यासामुळे ते वृध्दही झाले नाहीत. त्याचे चालण्याचे व्यसनही कमी झाले नाही. कोणाला तरी बरोबर घेऊन ते रोज चालायला जायचे. नवीन कार्यक्रमाना हजेरी लावायचे.

काल ते ९२व्या वर्षी गेल्याची बातमी वाचली. सगळया आठवणी उफाळून आल्या.

त्यांच्याच अेका लोकप्रिय गीताने त्यांच्या स्मृतीस मनोभावे प्रेमपूर्वक वंदन

अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवून जाती
दोन दिसांची रंगतसंगत दोन दिसांची नाती.

डॉ. मीना नेरुरकर

---